<table>
<tr><td rowspan="5">CNR No. MHKO200008092017</td><td>दाखल तारीख</td><td>–</td><td>१९</td><td>०४</td><td>२०१७</td></tr>
<tr><td>नोंदणी तारीख</td><td>–</td><td>२१</td><td>०४</td><td>२०१७</td></tr>
<tr><td>निकाल तारीख</td><td>–</td><td>०४</td><td>०५</td><td>२०२६</td></tr>
<tr><td colspan="2" rowspan="2">कालावधी</td><td>वर्ष</td><td>महिना</td><td>दिवस.</td></tr>
<tr><td>०९</td><td>००</td><td>१५</td></tr>
</table>

**दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कळे–खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर यांचे न्यायालयात ( पिठासीन अधिकारी व्ही.ए.लावंड–कोकाटे )**

**नियमित दिवाणी दावा क्र.३६३/२०१७**
**निशाणी क्र.३५/अ.**

| | | |
|---|---|---|
| **प्रवीण बाजीराव पाटील,** | ] | |
| व.व.३७ , धंदा– व्यवसाय, | ] | |
| रा. पोहाळे तर्फ बोरगांव, ता. पन्हाळा, | ] | **वादी** |
| जि. कोल्हापूर | ] | |
| **– विरुध्द –** | ] | |
| १. **सचिन बाजीराव पाटील,** | ] | |
| व.व.४१, धंदा – नोकरी, | ] | **प्रतिवादी** |
| रा. शिवालय स्वरुप अपार्टमेंट, प्लॉट नं.४०, स.नं.३६/१/४ समाज मंदीर जवळ, आंबेगाव बु.II, पुणे– ४११०४६ | ] | |
| २. **बाजीराव गणपती पाटील,** | ] | |
| व.व.६५, धंदा – शेती, | ] | |

**३. शितल महेश पाटील,** ]
व.व.३८, धंदा – घरकाम ]

**४. मंदाकिनी बाजीराव पाटील,** ]
व.व.६३, धंदा – घरकाम ]
]
प्रतिवादी नं.२ ते ४ रा. पोहाळे तर्फ बोरगांव, ]
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

**५. शाखाधिकारी, बँक ऑफ महाराष्ट्र,** ]
शाखा एम.आय.डी.सी. गोकुळ शिरगांव, ]
ता. करवीर, जि. कोल्हापूर.
]

---

**उपस्थिती –**
वादीतर्फे विद्वान विधीज्ञ – ॲड. श्री. एस. एस. पाटील.
प्रतिवादी नं.३ व ४ तर्फे विद्वान विधीज्ञ – ॲड. श्री. ए.एन. नाईक.
प्रतिवादी नं.१ व २ यांचे विरुध्द विना कैफियत.
प्रतिवादी नं.५ विरुध्द एकतर्फा.

---

**न्यायनिर्णय**
**(दिनांक ०४ मे २०२६ रोजी घोषीत )**

वादी यांनी प्रतिवादींविरुध्द प्रस्तुतचा दावा हिंदू वारसा कायदा कलम ८ प्रमाणे वाटप होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

**वादीचे दाव्यातील थोडक्यात कथन खालील प्रमाणेः**

०२. **दावा मिळकतीचे वर्णन** – मौजे पोहाळे तर्फ बोरगांव, ता.पन्हाळा, जि. कोल्हापूर येथील ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामपंचायत मिळकत

नं.२९५, क्षेत्र ६९ X ४४ फुट मधील दगड विट मातीचे कौलारू घर व खुली जागा यासी चतुःसीमा–

| | | |
|---|---|---|
| पूर्वेस | – | रस्ता, |
| पश्चिमेस | – | आकाराम दादू पाटील यांचा ग्रा.पं.मि.नं.२९४, |
| दक्षिणेस | – | रस्ता, |
| उत्तरेस | – | शिवाजी राजाराम पाटील यांची मिळकत. |

येणेप्रमाणे चतुःसीमेतील घर मिळकत हा या दाव्याचा वादविषय असुन त्यास येथुन पुढे सोयीकरीता संक्षिप्तपणे **''दावा मिळकत''** असे संबोधण्यात येते.

**०३.** वादी यांचे असे कथन आहे की, मौजे पोहाळे तर्फ बोरगांव येथील गणपती ज्ञानू पाटील हे खातेदार होते. त्यांना बाजीराव गणपती पाटील हा मुलगा, मंदाकिनी ही बाजीराव गणपती पाटील यांची पत्नी व त्या दोघांना सचिन, शितल व प्रविण अशी अपत्ये आहेत. अशी लागूपुरती वंशावळ असे. वादीचे आजोबा गणपती ज्ञानू पाटील हे मूळचे खातेदार होते. दावा मिळकत ही त्यांचे नावे ग्रामपंचायत रेकॉर्डला पूर्वीपासून होती. प्रत्यक्ष दावा मिळकत प्रतिवादी नं.२ यांचेकडे कब्जे वहिवाटीत होती व आहे. सदर मिळकत ही वडिलार्जित मिळकत असून सदर मिळकत वादीचे वडिलांचे हिश्श्यास आली होती. परंतु ग्रामपंचायत रेकॉर्डला आजोबांचे नावे होती. या गोष्टीचा गैरफायदा घेवून प्रतिवादी नं.१ हा उच्चशिक्षित असून त्याने त्याचे चाणाक्ष बुद्धीचा गैरफायदा घेवून प्रतिवादीचे आजोबा दावा मिळकत ही प्रतिवादी नं.१ ने त्याचे नावे करून घेतली. वादीचे वडील अशिक्षित होते व आहे. त्यामुळे प्रतिवादी नं.१ चे भूलथापांना बळी पडून प्रतिवादी नं.१ चे नावे करण्यास तथाकथीत संमतीपत्र करून घेतले. परंतू प्रत्यक्ष दावा मिळकत ही वादी–प्रतिवादी यांचे एकत्र कुटुंबाची होती व आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी नं.१ याने त्याचे

नावाचे नोंदीचा गैरफायदा घेवून करवीर तालुका, मौजे बालिंगे येथील रि.स.नं.२५५ व कोल्हापूर नगरपालिका हद्दीतील मिळकत प्रतिवादी न.५ ला तारण गहाण दिली. वास्तविक पाहता सदर मिळकत तारण गहाण देण्याचा अधिकार प्रतिवादी नं.१ ला नव्हते व नाहीत. अशा परिस्थितीत केवळ प्रतिवादी नं.२ ची दिशाभूल करून व वादी, प्रतिवादी नं.३, ४ यांना अंधारात ठेवून सदर मिळकत तारण देवून कर्ज घेतलेले आहे. ही बाब वादीचे नुकतीच निदर्शनास आलेली आहे. वास्तविक पाहता प्रतिवादी नं.१ याने प्रतिवादी न.२ चे विश्वासाचा गैरफायदा घेवून बेकायदेशीर कृत्य केलेले आहे. मुळात सदर मिळकत ही वडिलार्जित मिळकत असल्याने सदर मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी यांचा समान हिस्सा आहे. अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादी नं.१ ला सदर मिळकत तारण गहाण देण्याचा अधिकार नव्हता. त्यामुळे प्रतिवादी नं.१ ने करून दिलेले तारण गहाण खत हे मुलतः बेकायदेशीर स्वरूपाचे आहे. वाद मिळकतीमध्ये वादी हा पूर्वीपासून रहात आहे व आजही वाद मिळकत वादी व प्रतिवादी नं.२ ते ४ यांचे कब्जे वहिवाटीत आहे. प्रतिवादी नं.१ हा नोकरी निमित्त पुणे येथे राहत आहे.

**०४.** वादी यांचे पुढे असे कथन आहे की, वादी, प्रतिवादी नं.१ ते ४ यांचेमध्ये अद्यापही सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. परंतू, दावा मिळकतीमध्ये वादी आपले आई-वडिलांसह राहत आहे. अशी परिस्थिती असताना प्रतिवादी नं.५ चे तथाकथीत प्राधिकृत अधिकारी यांच्यामार्फत प्रतिवादी नं.१ च्या नावे ता.१७/४/२०१७ रोजी तहसिलदार साो. पन्हाळा यांचेमार्फत नोटीस वादीचे राहते घरी बजावणीसाठी आली असता प्रतिवादी नं.१ ने वाद मिळकत ही तारण गहाण दिलेची प्रथम माहिती वादीस मिळाली. त्यानंतर वादीने चौकशी केली असता प्रतिवादी नं.१ ने वाद मिळकतीसह मौजे

बालिंगे व कोल्हापूर महानगरपालिका हद्दीतील वादीचे वडिलार्जित मालकी वहिवाटीच्या मिळकती तारण गहाण देवून प्रतिवादी नं.५ कडून कर्ज घेतलेची बाब प्रथम निदर्शनास आली. त्याबाबत अधिक चौकशी केली असता प्रतिवादी नं.१ ने तथाकथीत कर्जाचे फेडीसाठी व वादींना हिस्सा मिळू नये या हेतूने मौजे बालिंगे येथील स.नं.२५५ व कोल्हापुर महानगरपालिका हद्दीतील रि.स.नं.८५८/२ व ८५९/२अ पैकी प्लॉट नं.९४ या मिळकतींची विक्री केलेली आहे, ही बाब वादीचे निदर्शनास आली. त्याबाबत वादीने कारवाई करण्याचा आपला हक्क राखून ठेवलेला आहे. सदर नोटीसीप्रमाणे प्रतिवादी नं.५ तर्फे प्राधिकृत अधिकारी यांचेमार्फत करीत असलेली कारवाई मुळात वादीवर बंधनकारक नाही. सदर कर्ज प्रकरणाचा वादीचा काहीही हक्क, हितसंबंध नाही. वादी राहत असलेली मिळकत ही वडिलार्जित मिळकत असून त्यामध्ये वादीचा अविभाज्य हक्क आहे.

**०५.** वादी यांचे पुढे असे कथन आहे की,अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादी नं.१ ने केलेली फसवणूक वादीचे निदर्शनास आल्याने वादीस वडिलार्जित मिळकतीमधील आपला हिस्सा अलग व पृथक करून मागणेसाठी प्रतिवादी नं.१ कडे ता.१७/४/२०१७ रोजी मागणी केली असता प्रतिवादी नं.१ ने उडवाउडवीची उत्तरे दिली, अशाप्रकारे प्रतिवादी नं.१ चे गैरकृत्यामुळे वादीचा संसार उघड्यावर येण्याची वेळ आलेली आहे. सदर कर्जाची वादी व प्रतिवादी नं.२ ते ४ यांचा अर्थाअर्थी काहीही संबंध नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादी नं.५ चे तथाकथीत आदेशाचा गैरफायदा घेवून प्रतिवादी नं.१ चे संगनमताने कब्जा केला तर वादीचा संसार उघड्यावर येणार आहे. त्यामुळे वादीस दावा मिळकतीमधील आपला हिस्सा अलग व पृथक करून मागणेसाठी दावा दाखल करणे भाग पडले आहे. तसेच प्रतिवादी नं.१ ने प्रतिवादी नं.५ चे

लाभात करून दिलेले तथाकथीत गहाणखत हे वादीचे हिश्श्यावर बंधनकारक नाही व वादीचा समाईकातील हिस्सा प्रतिवादी नं.१ यास गहाण देण्याचा हक्क नव्हता व नाही. त्यामुळे सदरचे गहाणखत वादीचे हिश्श्यावर बंधनकारक नाही, असे जाहीर होवून मिळणेसाठी दावा दाखल करावा लागत आहे. वादी यांनी दाव्याची योग्य तपशील व आकारणी करुन योग्य तो कोर्ट फी स्टँम्प दिलेला आहे. दावा मिळकत ही मे. कोर्टाच्या स्थळसिमेत असल्याने प्रस्तुतचा दावा मे. कोर्टाचे स्थळसिमेत दाखल केलेला आहे. सबब, दावा मिळकतीमधील वादीचा १/५ हिस्सा अलग व पृथक करून प्रतिवादी नं.१ ते ४ यांचेकडून देववावा, प्रतिवादी नं.१ ने प्रतिवादी नं.५ सोबत केलेले तथाकथीत तारण गहाणखत वादीचे हिश्श्यावर बंधनकारक नाही असे जाहीर होवून मिळावे, दावा मिळकतीचे वाटप कोर्ट कमिशनर यांचेमार्फत होवून मिळावे, दाव्याचा संपुर्ण खर्च वादीस प्रतिवादीकडून देववावा अशी विनंती वादी यांनी केली आहे.

**प्रतिवादी यांचे थोडक्यात कैफियत अशी की,**

**०६.** प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी नि.क्र.१९ कडे दाव्यास कैफियत दाखल करुन कथन केले आहे की, वादी यांनी मुळ दाव्यात केलेले दावा मिळकतीचे वर्णन योग्य व बरोबर असुन ते यातील प्रतिवादी नं.३ व ४ यांना मान्य व कबुल आहे. दाव्यात नमुद केलेली वंशावळ व संबंधीत मजकुर या बाबी देखील प्रतिवादी क्र.३ व ४ यांना मान्य व कबुल आहेत. दाव्यातील कलम ३ मधील संपुर्ण मजकुर जसे की, दावा मिळकत ही प्रत्यक्ष प्रतिवादी नं.२ यांच्याकडे कब्जे वहिवाटीस होती व आहे, सदर मिळकत ही वडीलोपार्जित मिळकत असुन सदर मिळकत वादीच्या हिश्यावर आली होती या बाबी वस्तुस्थितीस धुरुन व बरोबर असल्याने त्यांनी मान्य व कबुल केल्या आहेत. दाव्यातील कलम ४ मधील मजकुर जसे की, वादी व प्रतिवादी नं.१ ते

४ यांचेमध्ये अद्याप सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. परंतु, दावा मिळकतीमध्ये वादी आपले आई–वडीलांसह राहत आहेत. अशी परिस्थिती असताना प्रतिवादी नं.५ चे तथाकथीत प्राधिकृत अधिकारी यांच्यामार्फत प्रतिवादी नं.१ च्या नावे ता.१७/४/२०१७ रोजी तहसिलदार सो. पन्हाळा यांचेमार्फत नोटीस वादीचे राहते घरी बजावणीसाठी आली असता प्रतिवादी नं.१ ने वाद मिळकत ही तारण गहाण दिलेची प्रथम माहिती वादीस मिळाली. त्यानंतर वादीने चौकशी केली असता प्रतिवादी नं.१ ने वाद मिळकतीसह मौजे बालिंगे व कोल्हापुर महानगरपालिका हद्दीतील वादीचे वडिलार्जित मालकी वहिवाटीच्या मिळकती तारण गहाण देवून प्रतिवादी नं.५ कडून कर्ज घेतलेची बाब प्रथम निदर्शनास आली. त्याबाबत अधिक चौकशी केली असता प्रतिवादी नं.१ ने तथाकथीत कर्जाचे फेडीसाठी व वादींना हिस्सा मिळू नये या हेतूने मौजे बालिंगे येथील स.नं.२५५ व कोल्हापुर महानगरपालिका हद्दीतील रि.स.नं.८५८/२ व ८५९/२अ पैकी प्लॉट नं.९४ या मिळकतींची विक्री केलेली आहे, ही बाब वादीचे निदर्शनास आली. त्याबाबत वादीने कारवाई करण्याचा आपला हक्क राखून ठेवलेला आहे. सदर नोटीसीप्रमाणे प्रतिवादी नं.५ तर्फे प्राधिकृत अधिकारी यांचेमार्फत करीत असलेली कारवाई मुळात वादीवर बंधनकारक नाही. सदर कर्ज प्रकरणाचा वादीचा काहीही हक्क, हितसंबंध नाही. वादी राहत असलेली मिळकत ही वडिलार्जित मिळकत असून त्यामध्ये वादीचा अविभाज्य हक्क आहे. प्रतिवादी नं.१ ने प्रतिवादी नं.५ च्या लाभात करुन दिलेले तथाकथित गहाणखत हे वादीचे हिश्यावर बंधनकारक नाही व वादीचा समाईकातील हिस्सा प्रतिवादी नं.१ यास गहाण देण्याचा हक्क व अधिकार नाही. त्यामुळे सदरचे गहाणखत वादीचे हिश्यावर बंधनकारक नाही असे जाहिर होऊन मिळणेसाठी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. या बाबी प्रतिवादी नं.३ व ४ यांनी मान्य व कबुल केल्या आहेत.

**०७.** प्रतिवादी क्र.३ व ४ यांची कैफियत अशी आहे की, वास्तविक दावा मिळकतींचे अद्याप सरस निरस मानाने वाटप न झाले कारणाने व वादीसह प्रतिवादी नं.३ व ४ यांचे देखील हिस्सा अदयाप न ठरले कारणाने प्रतिवादी नं.१ ने दिलेले गहाण खत प्रतिवादी नं.३ व ४ यांचे हिस्सेवर बंधनकारक नाही व कधीही नव्हते. मुळातच कायादयाने एखादया वडिलार्जित मिळकतीचे सरसनिरस मानाने वाटप जोपर्यंत होत नाही तसेच सदर मिळती संबंधीच्या सह हिस्सेदारांचा कायदेशीर हिस्सा जोपर्यंत ठरत नाही तो पर्यंत कोणासही त्यांच्या हिस्सेची अथवा मालकी वहिवाटीची वडिलार्जित मिळकत कोणत्याही प्रकारे, व्यवहाराने हस्तांतरीत करण्याचा हक्क अथवा अधिकार प्राप्त होत नाही. अशा प्रकारे कायदेशीर तरतुद प्रचलित असताना प्रतिवादी नं.१ ने प्रतिवादी नं.५ सोबत केलेला व्यवहार प्रतिवादी नं.३ व ४ यांचे कायदेशीर हक्कांवर व हिस्सेंवर कधीही बंधनकारक नव्हते व नाही. परिणामी सदरचा व्यवहार हा बेकायदेशीर आहे.

**०८.** प्रतिवादी नं.३ व ४ यांचे कैफियतीमध्ये पुढे असे आले आहे की, प्रतिवादी नं.१ व ५ च्या संगनमताने त्यांचे दरम्यान झालेल्या बेकायदेशीर व्यवहाराच्या आधारे करत असलेली बेकायदेशीर कारवाईमुळे वादीसह प्रतिवादी नं.४ यांना देखील त्यांच्या राहत्या घरातुन बेदखल व्हावे लागेल, परिणामी सदर वडिलोपार्जित मिळकतीमध्ये त्यांचे व प्रतिवादी नं.३ यांचे असलेले कायदेशीर हक्क व अधिकार यांचेवर गदा येवून त्यांचे कधीही कशानेही न भरुन येणारे असे अपरिमित स्वरुपाचे नुकसान होणार आहे. ही वस्तुस्थिती व सत्य परिस्थिती आहे. परिणामी वादी त्यांचे दाव्यात प्रार्थिल्या प्रमाणे वादी बरोबर प्रतिवादी नं.३ व ४ यांचे देखील सदर दावा मिळकतीमधील हक्क व अधिकार यांचे संरक्षण होऊन सदरचा दावा पुर्ण गुणदोषावर चालुन सत्य

परिस्थिती कोर्टासमोर येणेस मदत होईल. परिणामी दावा अर्जी कलम ५ मधील मजकुर योग्य व बरोबर आहे.

०९. प्रतिवादी नं.३ व ४ यांचे कैफियतीमध्ये पुढे असे आले आहे की, वादी यांनी दावा अर्जी कलम ६,७ व ८ मध्ये नमुद केलेला मजकुर बरोबर आहे. तसेच वादी यांचे कलम ७ प्रमाणे वादी यांची विनंती मान्य करुन प्रतिवादी नं.१ ने प्रतिवादी नं.५ यांचे तर्फे सुरु असलेले बेकायदेशीर कृत्यामुळे सदर दाव्यामध्ये कायदेशीर गुंतागुंत होण्याची दाट शक्यता आहे. तरी प्रतिवादी नं.३ व ४ यांचा वडिलोपार्जित हिस्सा असल्याने सदर कामी त्याची सरस निरस मानाने वाटप होऊन कायदयाने प्रतिवादी नं.३ व ४ यांना सदरील वडिलोपार्जित मिळकतीमध्ये देय असणारा हिस्सा वाटप व तुटक होऊन मिळावा अशी विनंती प्रतिवादी नं.३ व ४ यांनी केली आहे. सबब, दावा मिळकतीमधील कायदेशीर त्यांना प्राप्त हिस्सा सरस निरस मानाने वाटप होऊन मिळावा व त्याप्रमाणे वादीचा दावा मंजुर करावा अशी विनंती प्रतिवादी नं.३ व ४ यांनी केली आहे.

१०. प्रतिवादी नं.१ व २ यांचे विरुध्द दावा विना कैफियत चालणेचा आदेश दि.१७/०२/२०१८ व दि.१५/०३/२०१८ रोजी नि.क्र.१ कडे झाला असुन प्रतिवादी नं.५ विरुध्द दावा एकतर्फा चालणेचा आदेश दि.१५/०३/२०१८ रोजी. नि.क्र.१ कडे झाला आहे.

११. दोन्ही पक्षकारांच्या वाद कथनांवरुन माझे पुर्वाधिकारी यांनी नि.क्र.२५ वर मुद्दे प्रस्थापित केले आहेत. प्रस्तुत दाव्यातील वाद कथनांचे व कागदपत्रांचे परिशिलन केलेनंतर तसेच तथात्मक बाबींचे विवेचनाअंती खालील प्रश्नबिंदूवरील माझे विश्लेषणात्मक निष्कर्ष कारणमिमांसा खालीलप्रमाणे नोंदविले आहेत –

| अ.क्र. | प्रश्नबिंदू | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी यांचा दावा मिळकतीमध्ये शांततामय कब्जेवहिवाट आहे हे वादी सिध्द करतात काय? | **होकारार्थी** |
| २. | प्रतिवादी क्र.१ व ५ हे वादीच्या दावा मिळकतीमधील शांततायम कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा करतात हे वादी सिध्द करतात काय? | **होकारार्थी** |
| ३. | दावा मिळकतीमधील वादीचा १/५ हिस्सा आहे हे वादी सिध्द करतात काय ? | **होकारार्थी** |
| ४. | प्रतिवादी नं.१ ने प्रतिवादी नं.५ सोबत केलेले तारण गहाणखत हे वादीचे हिश्यास बंधनकारक नाही हे वादी सिध्द करतात काय? | **होकारार्थी** |
| ५. | वादी हे दावा मिळकतीचे वादी व प्रतिवादी क्र.१ ते ५ यांच्यात सरस निरस मानाने वाटप झाले नाही हे सिध्द करतात काय? | **होकारार्थी** |
| ६. | वादी हे दावा मिळकतीमध्ये सरस निरस मानाने वाटप होऊन तुटक कब्जा मिळावा ही दाद मिळणेस पात्र आहेत काय? | **होकारार्थी** |
| ७. | वादी हे प्रतिवादी नं.१ ने प्रतिवादी नं.५ सोबत केलेले तारण गहाणखत हे वादीच्या हिस्सेवर बंधनकारक नाही असे जाहीर होऊन मिळावे ही दाद मिळणेस पात्र आहेत काय? | **होकारार्थी** |
| ८. | आदेश व हुकूम काय? | **दावा मंजुर करणेत आला.** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>वादीचा पुरावा</u>** –

**१२.** दाव्यातील कथने सिध्द करण्यासाठी वादीतर्फे साक्षीदार क्र.१

स्वत: वादी प्रविण बाजीराव पाटील यांनी सरतपासाचे शपथपत्र नि.क्र.३१ दाखल केले असुन त्यामध्ये त्यांनी दाव्यामधील कथनांचा उल्लेख केला आहे. वादी यांनी खालील काही कागदपत्रांचा आधार घेतला असुन वादी यांनी नि.क्र.३२ कडे पुरसीस दाखल करुन त्यांचा तोंडी पुरावा संपला असल्याचे न्यायालयास सुचीत केले आहे.

| अ. क्र. | कागदपत्रांचा तपशील | दिनांक | कागदपत्राचा प्रकार | निशाणी |
|---|---|---|---|---|
| १. | मौजे पोहाळे तर्फ बोरगांव, ता. पन्हाळा,जि.कोल्हापूर येथील ग्रामपंचायत मिळकत नं.२९५ चा नमुना ८चा उतारा | १७.०४. २०१७ | सही शिक्कयाची प्रत | ३३ |
| २. | वादीचे आजोबाचे नावाचा असेसमेंट उतारा | १७.०४. २०१७ | सही शिक्कयाची प्रत | ३४ |

**१३.** प्रतिवादी नं.३ व ४ यांनी वादीची कथने मान्य व कबुल केली असल्याने त्यांनी स्वतंत्र लेखी अथवा तोंडी तसेच कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. तसेच प्रतिवादी नं.१ व २ यांचेविरुध्द दावा विना कैफियत चालला आहे. त्याचबरोबर प्रतिवादी नं.५ यांचे विरुध्द दावा एकतर्फा चालेला आहे. त्यांना संधी देवुन देखील त्यांनी दाव्यामध्ये हजर होऊन लेखी अथवा तोंडी पुरावा दाखल केलेला नाही. जसे की वर नमुद केलेप्रमाणे प्रतिवादी नं.३ व ४ यांनी वादीचा दावा मान्य केला असल्याने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १२ नियम ६ अन्वये प्रस्तुत दावा हा जजमेंट ऑन ॲडमिशन या तत्वाला अधिन राहुन न्यायनिर्णय देणेत येत आहे. तसेच प्रतिवादी यांनी वादी यांचे साक्षीदाराचा उलटतपास नोंदवला नसल्यामुळे वादी यांची कथने विनाआव्हानित राहिलली आहेत.

**<u>मुद्दे क्रं.१ व २ करिता</u> –**

**१४.** वादी यांचा दावा मिळकतीमध्ये शांततामय कब्जे वहिवाट आहे हे वादी सिध्द करतात काय ? तसेच प्रतिवादी नं.१ व ५ हे वादीचे दावा मिळकतीमधील शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा करतात हे वादी सिध्द करतात काय? या बाबी पाहण्याकरिता प्रथमत: वादीचे विधीज्ञांनी केलेला युक्तीवाद विचारात घ्यावा लागेल. वादीचे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला आहे की, प्रत्यक्ष दावा मिळकत ही प्रतिवादी नं.२ यांच्याकडे कब्जे वहिवाटीस होती व आहे. सदर मिळकत ही वडिलोपार्जित मिळकत असुन सदर वादीच्या वडीलांचे हिश्यास आली होती. परंतु, ग्रामपंचायत रेकॉर्डला ती आजोबांच्या नांवे होती. सदर बाबींचा गैरफायदा घेवुन प्रतिवादी क्र.१ ने सदरची दावा मिळकत स्वत:च्या नांवे करुन घेतली. दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र कुटूंबाची होती व आहे. अशा परिस्थीतीत प्रतिवादी नं.१ ने त्याच्या नावाच्या नोंदीचा गैरफायदा घेवुन ता. करवीर, मौजे बालींगे येथील रि.स.नं.२५५ व कोल्हापूर नगर पालिका हद्दीतील मिळकत प्रतिवादी नं.५ ला तारण गहाण दिली. वास्तविक पाहता सदर मिळकत प्रतिवादी नं.१ ला तारण गहाण देण्याचा अधिकार नव्हता व नाही. दावा मिळकत ही वडिलोपार्जित मिळकत असल्याने सदर मिळकतीत वादी व प्रतिवादी यांचा समान हक्क आहे. वादी राहत असलेली मिळकत ही वडीलार्जित मिळकत असुन त्यामध्ये वादींचा अविभक्त हक्क आहे असा युक्तीवाद केला. प्रतिवादी नं.३ व ४ यांच्या विधीज्ञांनी नि.क्र.१९ वर दाखल असलेल्या कैफियतमधील नमुद मजकुराप्रमाणे दावा मान्य असल्याचे न्यायालयाला कळवले आहे.

**१५.** प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी क्र.१ व २ विरुध्द विनाकैफियत व प्रतिवादी नं.५ विरुध्द एकतर्फा आदेश पारित झाल्याने त्यांना संधी देवुन

देखील त्यांनी विहीत वेळेत कैफियत व स्वत: हजर झाले नाहीत. सबब, दावा त्यांचे कैफियत व म्हणण्याशिवाय पुढे चालला. परंतु प्रतिवादी नं.३ व ४ यांनी नि.क्र.१९ ला कैफियत दाखल करुन वादीच्या दाव्यातील कथने मान्य केली आहेत. प्रतिवादी नं.३ व ४ यांनी दावा मिळकतीचे वर्णन योग्य व बरोबर असल्याचे मान्य केले. त्याचबरोबर वंशावळी संबंधीचा मजकुर व वंशावळ देखील बरोबर असल्याचे सांगितले. दाव्याचा कलम ३ व ४ मधील मजकुर बरोबर असल्याचे सांगितले. त्याचबरोबर दावा अर्जी कलम ६,७ व ८ मधील मजकुर देखील खरा व बरोबर असल्याचे मान्य केले. मुळात दावा मिळकतीचे वादी व प्रतिवादी यांचेत वाटप झालेले नाही. अभिलेखावर नि.क्र.३३ व ३४ दाखल असलेल्या कागदपत्रान्वये वादी यांचा दावा मिळकतीत शांततामय कब्जे वहिवाट आहे. प्रतिवादी नं.१ व २ ने कैफियत दाखल केली नाही व प्रतिवादी नं.५ यांना समन्स बजावुनही ते स्वत: हजर झाले नाहीत. वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी हे दावा मिळकतीमधील शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा आणतात ही बाब दिसुन येते. करिता मी **मुद्दा क्रं.१ व २ चे उत्तर होकारार्थी** नोंदवत आहे.

**मुद्दा क्रं.३ करिता –**

**१६.** दावा मिळकतीमध्ये वादीचा १/५ हिस्सा आहे हे वादी सिध्द करतात काय? या मुद्दयाच्या सिध्दीकरिता वादीच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला आहे की, दावा मिळकतीचे अद्याप वादी व प्रतिवादी यांच्यात सरस निरस मानाने तोंडी स्वरुपात किंवा तडजोड स्वरुपात अशा कोणत्याही मार्गाने वाटप झालेले नाही. मुळात वाटप झाले नसताना प्रतिवादी क्र.१ ने त्याच्या नांवाच्या नोंदीचा गैरफायदा घेवुन प्रतिवादी नं.५ ला तारण गहाण दिली. मुळात तसा व्यवहार करण्याचा अधिकार प्रतिवादी नं.१ व ५ यांना येत नाही कारण

दावा मिळकतीचे अद्याप वाटप झालेले नाही. वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी नं.३ व ४ यांनी वादीचा दावा मान्य केला असुन त्यांची देखील वादीप्रमाणेच दावा मिळकतीत प्रत्येकी १/५ हिस्सा मिळणेची प्रार्थना प्रतिवादी नं.३ व ४ यांचे विधीज्ञांनी केली आहे. अभिलेखावर दाखल असलेल्या दस्तान्वये वादीने वाटपाविषयी कोणताही दस्त दाखल केला नसुन त्याला दावा मिळकती व्यतिरीक्त अन्य मिळकती नाहीत ही बाब समोर आलेने तसेच दावा मिळकत ही वडिलोपार्जित मिळकत असुन वादी व प्रतिवादी क्र.१ ते ४ चा समान हिस्सा असल्याने तसेच वादी यांनी अभिलेखावर दाखल असलेल्या ७/१२ उता–यान्वये ते दावा मिळकतीमधील १/५ हिस्सा मिळणेस पात्र आहेत ही बाब सिध्द केली असल्याने मी **<u>मुद्दा क्रं.३ चे उत्तर होकारार्थी</u>** नोंदवत आहे.

**<u>मुद्दे क्र.४ व ७ करिता –</u>**

**१७.** प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी नं.५ सोबत केलेले तारण गहाण खत हे वादीच्या हिश्यास बंधनकारक नाही हे वादी सिध्द करतात काय? वादी हे प्रतिवादी नं.१ ने प्रतिवादी नं.५ सोबत केलेले तारण गहाण खत हे वादीचे हिस्सेवर बंधनकारक नाही असे जाहिर होऊन मिळावे ही दाद मिळणेस पात्र आहेत काय? या बाबीच्या सिध्दीकरिता वादीचे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, प्रत्यक्ष दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र कुटूंबाची वडिलोपार्जित मिळकत होती व आहे. अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादी नं.१ याने त्याच्या ७/१२ सदरी असलेल्या नावाचा गैरफायदा घेवुन करवीर तालुका मौजे बालिंगे येथील रि.स.नं.२५५ व कोल्हापूर महानगर पालिका हद्दीतील मिळकत प्रतिवादी नं.५ ला तारण गहाण दिली या बाबी करिता मुळात प्रतिवादी क्र.१ याला तारण गहाण देण्याचा अधिकार आहे का? या प्रश्नावर प्रकाशझोत टाकणे फार महत्वाचे ठरते. मुळात दावा मिळकतीचे सरस निरस

मानाने वाटप झाले नसताना दावा मिळकत ही वादी नं.२ च्या कब्जेवहिवाटीस असताना सदर मिळकत ग्रामपंचायत रेकॉर्डला वादींचे पूर्वहक्कदार आजोबा यांच्या नांवे होती. सदर नोंदीचा गैरफायदा घेवुन प्रतिवादी नं.१ ने प्रतिवादी नं.५ ला तारण गहाण दिली. सदरचे तारण गहाण खत प्रतिवादी नं.१ ने अभिलेखावर दाखल केलेले नाही. वास्तविक पाहता दावा मिळकतीचे वाटप झाल्यानंतर प्रस्तुतचा व्यवहार प्रतिवादी नं.१ ने प्रतिवादी नं.५ च्या लाभात करणे अपेक्षित होते. तसे न करता वाटप होण्यापूर्वी प्रस्तुतचा व्यवहार झाला असल्याने प्रतिवादी नं.१ ने त्याचे नांव त्याच्या सोयीकरिता ७/१२ सदरी लावून सदरचा व्यवहार केल्याची बाब समोर येते. तसेच सदर व्यवहाराकरिता वादी व प्रतिवादी नं.२ ते ४ यांची तोंडी अथवा लिखीत स्वरुपात संमती घेतलेली नाही. यावरुनच प्रतिवादी नं.१ ने प्रतिवादी नं.५ चे लाभात करुन दिलेले तारण गहाण खत त्याचे हिश्यावर बंधनकारक राहील. ते वादी व प्रतिवादी नं.२ ते ४ यांच्या हिश्यावर बंधनकारक राहणार नाही. सबब, मी **मुद्दा क्र.४ व ७ चे उत्तर होकारार्थी** नोंदवत आहे.

**मुद्दे क्रं.५, ६ व ८ करिता**

**१८.** वादी हे दावा मिळकतीचे वादी व प्रतिवादी क्रं.१ ते ४ यांच्यात सरस निरस मानाने वाटप झाले नाही हे सिध्द करतात काय? वादी हे दावा मिळकतीमध्ये सरस निरस मानाने वाटप होऊन तुटक कब्जा मिळावा ही दाद मिळणेस पात्र आहेत काय? वादी यांनी प्रस्तुतचा दावा मिळकतीचे वाटप व कब्जा तुटक होऊन मिळणेकरिता दाखल केला असुन वादीचे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, दावा मिळकत ही आजरोजी प्रतिवादी क्र.२ यांच्या कब्जेवहिवाटीस असुन ७/१२ सदरी वादी व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांची नांवे नोंद नाहीत. त्यांच्यात पुर्वी वाटप झालेले नाही. मुळात दावा मिळकत ही वादी

व प्रतिवादी यांची वडिलोपार्जित एकत्र कुटूंबाची मिळकत असल्याने व प्रतिवादी क्र३ व ४ यांनी वादी यांचा दावा मिळकतीमध्ये असलेला हिस्सा मान्य केला असल्याने प्रथमदर्शनी दावा मिळकतीचे वाटप झाले नाही ही बाब समोर येते. प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी नं.१ व २ यांचे विरुध्द दावा विना कैफियत चालला व प्रतिवादी नं.५ विरुध्द दावा एकतर्फा चालला असल्याने वादीच्या दाव्यातील तसेच शपथपत्रातील कथने विनाआव्हानित राहिली असल्याने वादीची कथने आजअखेर अबादित विनाआव्हानित राहिलेली आहेत. याबाबींवरुन वादी व प्रतिवादी नं.१ ते ४ यांचेमध्ये दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप झालेले नाही असे समोर येत आहे. त्यामुळे सदर दाव्याच्या न्यायनिर्णयान्वये वादी व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना त्यांचा प्रत्येकी १/५ हिस्सा व सदर हिश्यातील सोयीनुरुप कब्जेवहिवाट दयावी लागणार असल्याने मी **मुद्दा क्रं.५ व ६ चे उत्तर होकारार्थी** नोंदवून **मुद्दा क्रं.८** चे उत्तरादाखल खालील प्रमाणे अंतिम आदेश पारित करीत आहे –

## आदेश

१. दावा मंजुर करणेत येतो.

२. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, वादी यांचा दावा मिळकतीमधील १/५ हिस्सा सरस निरस मानाने वाटप होवुन तुटकपणे कब्जा प्रतिवादी नं.१ ते ४ यांचेकडुन मिळणेस वादी पात्र आहेत.

३. प्रतिवादी नं.१ ने प्रतिवादी नं.५ सोबत केलेले तथाकथीत तारण गहाणखत वादीचे हिश्श्यावर बंधनकारक नाही असे सदर आदेशाद्वारे जाहीर करणेत येत आहे.

४. दावा मिळकतींचे वाटप व हिस्सेनिहाय कब्जे बहाली दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे कलम ५४ प्रमाणे जिल्हाधिकारी, कोल्हापूर किंवा त्यांनी निर्देशित केलेल्या त्यांच्या दुय्यम राजपत्रीत अधिका–याने कब्जा वेगळा करण्याच्या कायदेशीर तरतुदींच्या अधीन राहून करावयाच्या आहेत. त्याकरीता हुकूमनाम्याची प्रत जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे पाठविण्यात यावी व त्यांनी ग्रामपंचायत मिळकत नं.२९ क्षेत्र ६९ X ४४ फुट मधली खुली जागा यांचे वाटप करावे व सदर मिळकतीत क्षेत्र ६४ X ४४ फुट मधील दगड विट मातीचे कौलारु घर यांचे वाटप कोर्ट कमिशरन यांचे मार्फत करुन घेणे न्यायोचित होईल. कोर्ट कमिशरन करिता स्वतंत्र अर्ज दाखल करावा लागेल.

५. दोन्ही पक्षकारांनी स्वतःचा खर्च स्वतः सोसावा.

६. येणे प्रमाणे हुकुमनामा करण्यात यावा.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)**

Digitally signed by VAISHALI
Date: 2026.05.04 18:04:55 +0530

(व्ही.ए.लावंड–कोकाटे)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
कळे–खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

कळे–खेरीवडे.
दि.०४.०५.२०२५.